# तळोदा नगरपरिषद, तळोदा
## जिल्हा – नंदुरबार

Email-conp.tldr@gmail.com फोन नं-(02567)232231

जा /क्र /तनप/आरोग्य / 692 /२०२६. दिनांक :13 /5 /२०२६

## ई –निविदा सूचना.

मुख्याधिकारी तळोदा नगरपरिषद तळोदा यांच्या कडून खालील कामाकरिता ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) योग्य त्या पात्र नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु | इसारा रक्कम रु | निविदा फॉर्म ची किंमत रु | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान . व घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत तळोदा नगरपरिषद क्षेत्रातील द्वार स्तरावरील दैनंदिन निर्माण ओला व सुका कचरा घंटागाडी द्वारे वर्गीकृतरित्या संकलन, वाहतूक व प्रकिया करणे ,कचरा कुंडीवरील कचरा गटारीचा गाळ ,डेब्रिज संकलन व वाहतूक करणे ,शहरातील रस्ते साफ सफाई व गटार स्वच्छता तसेच स्वच्छतेशी संलग्न अनुषंगिक कामे करणे बाबत . | ६९५०९५८ /- | ६९५१० /- | ५००० /- | ६ महिने |

| अ.क्र. | नगरपरिषदेने करावयाची प्रकिया | मक्तेदाराने करावयाची प्रकिया | दिनांकापासून | दिनांकापर्यत | लिफाफा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ऑनलाईन निविदा प्रकाशित करणे | | १४ /०५/२०२६ ११ :०० वाजता | | तांत्रिक व आर्थिक |
| २ | | ऑनलाईन निविदा डॉक्यूमेंट डाऊनलोड व सबमिशन करणे | १४ /०५/२०२६ ११:०० वाजता | २१ /०५/ २०२६ १७ :०० वाजंता | तांत्रिक व आर्थिक |
| ३ | ऑनलाईन टेंडर उघडणे | | २२ /०५/२०२६ . १७:०० वाजता (शक्य असल्यास ) | | तांत्रिक |
| | | | २५ /०५/२०२६ १७ :०० वाजता (शक्य असल्यास ) | | आर्थिक |

AnyScanner

**अटी व शर्ती :**

१) सर्व पात्र इच्छुक मक्तेदारांनी ऑन लाईन निविदाभरण्यासाठीwww.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर भरावी.

२) कोऱ्या निविदेची रक्कम व बयाणा रक्कम ही फक्त ऑन लाईन नेट बँकिंग पद्धतीनेच भरावी. दुसऱ्या कुठल्याही मार्गाने सदरची रक्कम स्विकारली जाणार नाही.

३) खालील नमूद केलेली सर्व कागदपत्रे साक्षांकित (स्वाक्षरी व शिक्का) स्कॅन करून www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर अपलोड करावीत. अन्यथा मक्तेदारास निविदा प्रकियेतून बाद करण्यात येईल.

A) ऑन लाईन भरलेल्या कोऱ्या निविदेची रक्कमेची व बयाणा रक्कमेची प्रत.
B) नोंदणी प्रमाणपत्र (लागू असलेल्या योग्य त्या यंत्रणेकडे)
C) pan card ,जी.एस.टी.नोंदणी व ई.पी.एफ.नोंदणी प्रमाणपत्र.
D) सी.ए.सर्टिफाईड केलेले मागील ३ वर्षाचे Turnover व ३ वर्षाचे ITR.
E) अनुभव प्रमाणपत्र निविदा अटी व शर्ती प्रमाणे.

४) तांत्रिक लिफाफ्यातील आवश्यक कागदपत्र्यांची पूर्तता करणाऱ्या मक्तेदारांचाच आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल .या शिवाय इच्छुक मक्तेदारास सोबत जोडलेल्या परिशिष्ठ "अ" मधील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

५) अटी व शर्ती ची निविदा स्विकारली जाणार नाही.

६) निधी उपलब्धतेनुसार बिलाची अदायगी करण्यात येईल. व बिलातून शासकीय नियमानुसार कपात करण्यात येईल.

७) कोणतेही कारण न देता निविदा मंजूर अथवा नामंजूर किंवा रद्द करण्याचा अधिकार नगरपालिकेने राखून ठेवला आहे.

८) ई -निविदेशी संबंधित सविस्तर माहितीwww.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

नगर पालिका तळोदे जि. नंदुरबार

मुख्याधिकारी
तळोदा नगरपरिषद तळोदा

AnyScanner

**अटी व शर्ती :**

## परिशिष्ठ – अ

१ . सर्व पात्र / इच्छुक निविदाधारकांनी निविदा प्रकियेत भाग घेण्यासाठी mahatenders.gov.in संकेतस्थळावर enroll होणे आवश्यक आहे.निविदापत्रक डाऊनलोड करणे साठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२ . निविदाधारकांनी निविदा संदर्भात सर्व दस्त ऐवज ऑन लाईन सादर करणे अनिवार्य राहील.

३ .सदर निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखू ठेवलेले आहे.

४.तळोदा नगपरिषदेसाठी ई –निविदा प्रणाली www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

५ ) संपूर्ण शहराच्या स्वच्छतेकामी शहराचे पुर्ण सर्व्हेक्षण करुन, नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ नुसार व स्वच्छ भारत अभियानाच्या मार्गदर्शक सुचनेनूसार शहर स्वच्छता कृती आराखडा सादर करावयाचा आहे .मक्तेदाराने सादर केलेल्या कृती आराखड्यानुसार, शहरातील कचरा संकलन करतांना कचरा वेग-वेगळा ओला .सुका व घरगुती घातक गोळा करुन त्याची स्वतंत्ररित्या वाहतुक करणे व नगरपरिषद सांगेल तेथे विल्हेवाट करणे मक्तेदाराला बंधनकारक आहे.

६.) कामांसंबंधी तक्रारींची दखल घेवून त्याचे निराकरण त्वरीत न झाल्यास प्रती कामासाठी रक्कम रु.५०० -/मात्र दंड म्हणून मासिक बिलातून कपात करण्यात येईल.

७) नगरपरिषद लेखी निर्देश देईल त्यावेळी निविदा व्यतिरिक्त कामे करावे लागतील .या कामा करीता नगरपरिषद कुठलेही अतिरिक्त बिल अदा करणार नाही.

८) नगरपरिषदेमधीलसन्माननीय पदाधिकाऱ्यांचा तक्रारीचे निराकरण तात्काळ करावे लागेल.

९ (आलेल्या तक्रारी व निवारण केलेल्या तक्रारींचे दैनंदिन नोंदी दररोज नगरपरिषदेच्या स्वच्छता निरीक्षक यांना कळव्यावा लागतील.

१० (भाजी मार्केट, कृषी उत्पन्न बाजार समिती, मटन मार्केट, उपजिल्हा रुग्णालय यांचेकडील घनकचरा दररोज उचलणे मक्तेदारास बंधनकारक राहील.

११ (कामगारांना सफाई साहित्य पुरविणे ही जबाबदारी सर्वस्वी मक्तेदाराची असेल.त्यासाठी नगरपरिषद कोणतेही साहित्य पुरविणार नाही.

१२ (नागरिकांच्या तक्रारीसाठी स्वतंत्र तक्रार निवारण केंद्र स्थापन करुन तेथे स्वखर्चाने टोल फ्री /दुरध्वनी क्रमांक' 'मोबाईल क्रमांक ठेवावा लागेल व संगणीकृत व्यवस्था ठेवावी 'लागेल याकामी न.प .कोणताही अतिरिक्त मोबदला देणार नाही.

१३ घनकचरा(व्यवस्थापन व हाताळणी नियम, २०१६ नुसार अंमलबजावणी करण्यासाठी दैनंदिन पर्यवेक्षणासाठी सुपरवायझर नेमणे बंधनकारक आहे व त्यांनी स्वच्छता विभागाकडे दैनंदिन अहवाल सादर करावा.

१४ (कामावरील कर्मचाऱ्यांना) कामाच्या कालावधीपर्यंत (विमा संरक्षण द्यावे लागेल.तसेच कामगारास दुखापत झाल्यास अगर कामावर मयत झाल्यास आवश्यक मोबदला वर्क मॅनस् कॉम्पेनसेशन ॲक्ट नुसार द्यावा लागेल.

१५ कामावरील (कामगारांना / कर्मचाऱ्यांना मास्क, ग्लोव्ज, गमबुट, रेनकोट व गणवेश, वैद्यकिय सुविधा तसेच साफ सफाई-करणाऱ्या कामगारांना लागणारे सफाई साहित्य जसे झाडू, बादल्या, तगारी, फावडा, हातलाऱ्या व इतर सफाई उपकरणे पुरविणे मक्तेदारावर बंधनकारक राहील .वेळोवेळी शासन निर्णया प्रमाणे कर्मचाऱ्यांना सुविधा देणे बंधनकारक राहील.

१६ (कामाचे पर्यवेक्षन मुल्यमापन न.पा .स्तरावरुन वेळोवेळी करण्यात येईल .या वेळी त्रुटी आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

१७ (सफाई विषयक काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्य विषयेक सुरक्षतेची जबाबदारी मक्तेदाराची राहील या बाबतीतील सर्व शासण निर्णय मक्तेदारावर बंधनकारक राहील.

१८ (अभिकर्त्याने ठेक्यावरील कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी खाती, विमा काढून त्यांची वर्गणी व मक्तेदाराचे अंशदान भरण्याची जबाबदारी अभिकर्त्याची भरणा करून त्यांच्या छायांकित एफ.पि.राहील व कामगारांचा ई(मक्तेदाराची)प्रती बिलासोबत जोडणे बंधनकारक राहील .चलणे, हजेरी पत्रक इत्यादी सादर करणे बंधनकारक राहील.

१९ (मक्तेदार यांच्या अधिपत्याखालील सेवा पुरविणेकामी कार्यरत यंत्रणेस अनुज्ञेय लाभ दरमहा बँक खात्यात अथवा धनादेशाद्वारे वेळेवर देणे मक्तेदार यांचेवर बंधनकारक आहे .त्याबाबत दरमहा देयकासोबत तपशिल, पुर्तता अहवाल सादर करणे मक्तेदारावर बंधनकारक असेल अन्यथा पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही .तसेच बिल अदा करण्यास विलंब झाल्यास मक्तेदाराने कार्यरत यंत्रणेस) त्याच्या कर्मचाऱ्यांस (कामाचा मोबदला / वेतन न थकविता नियमितपणे ठरलेल्या वेळेत स्व निधीतून देणे बंधनकारक आहे .कर्मचाऱ्यांना पगार वेळेवर मिळाला नाही या सबंबीवर त्यांचे दैनंदिन कामावर कोणतेही परिणाम न होवू देण्याची जबाबदारी सर्वस्वी मक्तेदाराची राहील.

२० (रोजंदारीचे कामगार) कुशल/अकुशल (लावण्यात येतील, त्यांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार वेतन देण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील .याबाबत न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याचे निराकरण करण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील.

२१ (बाल मजुर लावता येणार नाही.

२२ (दैनंदिन संकलित होणारा कचरा हा नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन केंद्रावर शास्त्रोक्त पध्दतीने न्ेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

२३ (निविदे बाबतचा कायदेशीर वाद उद्भवल्यास तो मां.तळोदा न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात राहील.

२४ (नगरपरिषदेद्वारे मक्तेदारास देण्यात येणाऱ्या वाहनांचा नगरपरिषद ठरवेल त्या प्रमाणे वाहनाचा परतावा मासिक बिलातून कपात करण्यात येईल.

२५ (निविदेत नमुद केलेले दर सर्व करांसहीत असून नगरपालिका कुठलाही जादा चा दर अदा करणार नाही व त्याबाबत कोणताही दावा मक्तेदार करणार नाही.

२६ (नगर परिषदेकडून ज्या निविदा धारकावर कारवाई प्रस्तावीत आहे किंवा कारवाई झालेली आहे तो निविदा धारक निविदेमध्ये सहभाग घेण्यास अपात्र राहील.

२७ )किमान वेतन कायदा तसेच मजुर कायदे या संबंधी अस्तित्वात असलेल्या इतर कायद्याची अंमलबजावणी करणेची

SCAN AnyScanner

२८) निविदा स्विकारण्याचा / नाकारण्याचा / अटी-शर्ती शिथील करण्याचा / बदल करण्याचा / कोणतेही कारण नमुद न करता निविदा रद्द करण्याचा अधिकार निविदा समितीस राहील, हे मक्तेदार यांना माहित आहे

२९) नगर परिषद मालकीच्या विविध इमारतीची वेळोवेळी आवश्यकतेनुसार साफ-सफाई करावी लागेल. तसेच शासकिय / धार्मिक उत्सवाचे वेळीचे कार्यक्रमासाठी स्वच्छता करण्याची जबाबदारी मक्तेदाराची राहील.

नगरपरिषदेने पुरविलेल्या वाहनांच्या देखभालीबाबत:-

३०) नगरपरिषदेकडून पुरविण्यात आलेली वाहने ज्या स्थितीत पुरविण्यात आली ती करार संपल्यावर सर्वसामान्यपणे घसारा वगळून वाहने ज्या स्थितीत पुरविण्यात आली होती त्या स्थितीत परत करावी लागतील. नादुरुस्त वाहन दुरुस्त केल्यानंतरच परत घेतले जाईल.

३१ ) नगरपरिषदेने निश्चित केलेल्या मोटार गॅरेज मध्ये वाहनांची देखभाल व दुरुस्ती मक्तेदारास बंधनकारक असेल. वाहनांचा वापर करुन योग्य प्रकारे होत नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आल्यास तसेच बंद असलेले वाहन आठ दिवसाच्या आत दुरुस्त न केल्यास मक्तेदारावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

३२ ) नगरपरिषदेने पुरविलेली वाहने नगरपरिषद आवारात पार्क करावे किंवा मक्तेदाराने स्वतः वाहन पार्किंगची व्यवस्था करावी, या कामी नगरपरिषद कुठलाही मोबदला देणार नाही. नगरपरिषदे मार्फत पुरविणेत येणाऱ्या वाहनांचे व यंत्रसामुग्रीचे सेवाबाबत प्रतिपूर्ती मोबदला मंजूर ठरावाच्या दरानुसार नगरपरिषदेस अदा करणे लिहून देणार यांच्यावर बंधनकारक असेल. सदर मोबदला देयकातून वसूल करणेचे अधिकार मुख्याधिकारी यांना राहील.

३३ ) वाहन दुर्घटना झाल्यास होणाऱ्या खर्चास व कामगाराच्या दुखापतीस नगरपरिषद जबाबदार राहणार नाही

३४ ) घनकचऱ्याचे विलगीकरण केलेले नसल्याचे आढळून आल्यास नगरपरिषदेने ठरविलेल्या दंडाची रक्कम मासिक बिलातुन कपात करण्यात येईल.

३५ ) कचरा गाड्या कचरा वाहतुक करतांना ताडपत्रीने किंवा इतर कुठल्याही साहित्याने झाकलेली असणे आवश्यक आहे.

३६ ) फिरते शौचालय नगरपरिषद सांगेल त्या ठिकाणी लिहून देणार यांना लावावे लागेल व त्याची साफ-सफाईची व्यवस्था ठेकेदारास मोफत करावी लागेल.

३७ ) घनकचरा व्यवस्थापन कामासाठी वापरण्यात येणारे सर्व बाहनांची नोंद ठेवणे मक्तेदारावर बंधनकारक आहे.

३८ ) सर्व वाहनांचे जीपीएस रिपोर्ट दरमाह सादर करणे मकतेदाराय बंधनकारक राहील.

३९ ) पावसाळा सुरु होण्यापूर्वी विविध मुख्य नाल्यातील गाळ जे.सी.बी. मशीनव्दारे काढून साफसफाई करणे याची संपूर्ण जबाबदारी मक्तेदाराची राहील, या कामी मक्तेदारास वेगळा मोबदला दिला जाणार नाही.

४० ) गटारीचा गाळ तळापर्यंत खरडून काढावा लागेल. तसेच उघड्या गटारी,डबके, नाले न.प.निर्देश देईल तेव्हा जंतुनाशक पावडर, फवारणी मक्तेदाराम स्वखर्चाने करावी लागेल .

४१ ) शासकीय सुटयाच्या दिवशी मक्तेदारास स्वतःची यंत्रणा कार्यरत ठेवून स्वच्छता विषयक कामे करावी लागतील.

४२ ) स्वच्छ सर्वेक्षण , माझी वसुंधरा अभियान तसेच शासनाचे इतर योजना अंतर्गत इतर अनुषंगिक कामे करणे मक्तेदारास बंधनकारक राहोत.

४३ ) सकाळी ०६:०० ते रात्री ८:०० या कालावधीसाठी अत्यावश्यक कामासाठी किंवा आपत्कालीन कामासाठी २ पथके ठेवावी लागतील. १ पथकात १ मुकादम, २ ड्रेनेज कामगार,२ सफाई कामगार,१ वाहन चालक, १ ट्रॅक्टर/डंपर/घंटागाडी असतील.

४४ ) शासकिय लेखा परीक्षणात आक्षेप निघाल्यास त्याची पुर्तता करणेची जबाबदारी अभिकर्त्याची राहील. लेखा परीक्षणात वसुली निघाल्यास न.पा. निर्देशानुसार त्वरीत रक्कम भरावी लागेल तसेच आक्षेपांच्या अनुपालनासाठी आपल्याशी संबंधीत बाबींची पुर्तता करावी लागेल

४५ ) झालेल्या कामाचे दारमहाचे बिल आवश्यक संपूर्ण कागदपत्रासह (दैनंदिन अहवाल,वाहनांचे लॉगबुक,ई.पि.एफ चलन ,कर्मचाऱ्यांचा विमा काढल्याची प्रत)नगरपरिषदेस प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करावे. उशिरा बील सादर केल्यास व त्यामुळे मोबदला मिळण्यास उशीर झाल्यास नगरपरिषद जबाबदार राहणार नाही. उपलब्ध निधीनुसार बिल अदा करण्यात येईल.कोणत्याही परिस्थितीत आडव्हान्स अदा केला जाणार नाही.

४६ ) बिल हिशोबातील नजरचुकीने जादा रक्कम अदा केली गेली असल्यास जादा रक्कम न.पा. कार्यालयात त्वरीत भरणा करावी लागेल . असे न केल्यास पुढील देयकातून ती वसुल करण्यात येईल.

४७ ) मंजूर निविदा दरापेक्षा कोणत्याही सबबीवर दर वाढ दिली जाणार नाही.

४८ ) बेवारस प्रेत दफन , बेवारस गुरे इ. बाबतीत प्रचलीत महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या तरतुदीनुसार त्याप्रमाणे कामे पार पाडावे लागतील. नियमा विरुध्द कार्यवाही केल्यास त्यापुढील कायदेशीर जवाबदारी अभिकर्त्याची राहील.

४९ ) कामासंबंधी तंटा/वाद-विवाद उद्भवल्यास त्याचे निराकरण करणेसाठी नगरपालिके तर्फे नेमलेल्या लवाद समितीने दिलेल्या निर्णय/आर्थिक दंडणीय अथवा इतर स्वरुपात अंतीम राहील.

५० ) वेळोवेळी अंमलात असलेले सर्व शासकीय कर बिलातुन कपात करण्यात येतील.

५१ ) मक्तेदाराच्या अधिपत्या खालील कर्मचाऱ्यांची नावाची यादी,त्यांना सोपविलेले काम,परिसर याची माहिती स्वच्छता विभागास देणे बंधनकारक राहील.

५२ )शहरात प्रत्येक घर/अस्थापना वर लावण्यात आलेले ICT क्यूआर कोड दररोज १००% स्कॅन करून त्याचा दैनंदिन अहवाल स्वच्छता विभागास देणे बंधनकारक राहील.

नगर पालिका तळोदे जि. नंदुरबार

(विक्रम जगदाळे )
मुख्याधिकारी
तळोदा नगरपरिषद तळोदा

Signature Not Verified
Digitally signed by Vikram Murlidhar Jagdale
Date: 2026.05.14 01:16:48 IST
Location: Maharashtra-MH

AnyScanner